श्रीमती राधिकाबाई मेघे मेमोरियल कॉलेज
ऑफ नर्सिंग, सावंगी (मेघे), जि.वर्धा.

पोस्ट बेसिक नर्सिंग पदव्युत्तर पदविका
अभ्यासक्रम सुरु करण्यास परवानगी देणेबाबत.

महाराष्ट्र शासन
शासन निर्णय क्र.पीजीएम १४२०/प्र.क्र.६३/२०/शिक्षण २.
वैद्यकीय शिक्षण व औषधिद्रव्ये विभाग,
गो.ते.रुग्णालयाची नवीन इमारत, ९ वा मजला, गो.ते.रुग्णालय संकुल,
लोकमान्य टिळक मार्ग,नवीन मंत्रालय, मुंबई-४०० ००१.
दिनांक:-०८/०८/२०२२

**संदर्भ:-** १) संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय यांचे पत्र क्र.एनयुआर/आर.एम.मेमोरियल कॉलेज ऑफ नर्सिंग, सावंगी, जि.वर्धा/सक्षमता तपासणी/परिचर्या/ई/७६४२/२०, दिनांक १४/१२/२०२०.
२) शासन पत्र, समक्रमांक, दिनांक २६/१२/२०२०
३) कुलसचिव, दत्ता मेघे इन्स्टिट्युट ऑफ मेडिकल सायन्सेस (अभिमत विद्यापीठ) यांचे पत्र क्र.डीएमआयएमएस (डीयू)/२०१९-२०/८३१, दिनांक ०३/०३/२०२०.

**प्रस्तावना:-** श्रीमती राधिकाबाई मेघे मेमोरियल कॉलेज ऑफ नर्सिंग, सावंगी (मेघे), जि.वर्धा या महाविद्यालयास ऑपरेशन रूम नर्सिंग व क्रिटीकल केअर नर्सिंग या दोन विषयातील पोस्ट बेसिक डिप्लोमा अभ्यासक्रम सुरू करण्यास वरील संदर्भ क्रमांक ३ च्या पत्रान्वये दत्ता मेघे इन्स्टिट्युट ऑफ मेडिकल सायन्सेस (अभिमत विद्यापीठ) यांच्याकडून शासनास प्रस्ताव प्राप्त झाला होता. त्यानुसार सक्षमता तपासणी करून संदर्भाधीन क्रमांक १ च्या पत्रान्वये संचालनालयाकडून शासनास शिफारशीसह प्रस्ताव सादर करण्यात आला आहे. त्यामुळे उक्त दोन अभ्यासक्रम प्रत्येकी ०५ इतक्या विद्यार्थी प्रवेशक्षमतेने सूरू करण्यास मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय:-** श्रीमती राधिकाबाई मेघे मेमोरियल कॉलेज ऑफ नर्सिंग, सावंगी (मेघे), जि.वर्धा या संस्थेत सन २०२२-२३ या शैक्षणिक वर्षापासून पुढील पदव्युत्तर पदविका अभ्यासक्रम सुरु करण्यास शासनाची मान्यता प्रदान करण्यात येत आहे:-

| अ.क्र. | अभ्यासक्रम/विषय | प्रवेश क्षमता |
|---|---|---|
| १ | पोस्ट बेसिक डिप्लोमा (ऑपरेशन रूम नर्सिंग) | ०५ |
| २ | पोस्ट बेसिक डिप्लोमा (क्रिटीकल केअर नर्सिंग) | ०५ |

२. सदर मान्यता ही पुढील अटी व शर्तीस अधीन राहील :-

१) सदर महाविद्यालयातील ऑपरेशन रूम नर्सिंग व क्रिटीकल केअर नर्सिंग या विषयातील पोस्ट बेसिक (नर्सिंग) पदव्युत्तर पदविका अभ्यासक्रमांची विद्यार्थी प्रवेशक्षमता प्रत्येकी ०५ इतकी राहील.

२) राज्य शासन/ केंद्र शासन/ मा.सर्वोच्च न्यायालय अथवा मा.उच्च न्यायालय यांनी वेळोवेळी दिलेल्या आदेशानुसार सदर अभ्यासक्रमाच्या प्रवेशाकरिता निश्चित करण्यात आलेली कार्यपध्दती अवलंबिण्यात यावी.

३) शासकीय नियम/अधिनियम, मा.सर्वोच्च व मा.उच्च न्यायालय यांनी वेळोवेळी दिलेल्या निर्णयानुसार शैक्षणिक शुल्कासाठी जी कार्यपध्दती अनुसरणे वेळोवेळी भाग असेल, त्याप्रमाणे शैक्षणिक शुल्क निश्चित करण्यात यावे.

४) भारतीय परिचर्या परिषद /महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक व राज्य शासन यांनी नर्सिंग अभ्यासक्रमाबाबत वेळोवेळी विहीत केलेल्या नियमांचे व मानकांचे पालन करणे संस्थेवर बंधनकारक राहील.

५) महाराष्ट्र एज्युकेशनल इन्स्टिटयूशन्स (प्रोहिबिशन ऑफ कॅपिटेशन फी) ॲक्ट,१९८७ (महाराष्ट्र ॲक्ट १९९८ चा ६) मधील तरतूदींचे संस्थेने काटेकोरपणे पालन करणे आवश्यक आहे.

६) संस्थेने कोणत्याही परिस्थितीत शासनाने मान्य केलेल्या विद्यार्थी प्रवेशक्षमतेपेक्षा जास्त विद्यार्थी प्रवेशित करू नये.

७) सदरहू संस्थेस कायम विना अनुदान तत्वावर मान्यता देण्यात आली आहे . त्यामुळे संस्था आवर्ती/अनावर्ती वा अन्य स्वरुपाच्या कोणत्याही खर्चासाठी शासनाकडे अनुदानाची मागणी करण्यात येणार नाही.

८) शासकीय वैद्यकीय/नर्सिंग किंवा तत्सम महाविद्यालयातील कोणत्याही अध्यापकास तो सेवानिवृत्त होईपर्यंत संस्थेमध्ये नोकरी देता येणार नाही किंवा त्यांच्या सेवा संस्थेस वापरता येणार नाहीत.

९) दत्ता मेघे इन्स्टिट्यूट ऑफ मेडिकल सायन्सेस (अभिमत विद्यापीठ) यांनी संस्थेस विद्यार्थी प्रवेश करण्यास परवानगी देण्यापूर्वी संस्था मानकांची पूर्तता करीत आहे याची खात्री करावी.

१०) संस्थेने उपरोक्त नर्सिंग महाविद्यालयातील प्रवेश सुरू करण्यापूर्वी संबंधित विद्यापीठाची संलग्नता प्राप्त झाल्यानंतर सदर संस्थेत विद्यार्थी प्रवेश करावेत.

३. सदर आदेश महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ अधिनियम,१९९८ मधील कलम ६४ (५) नुसार शासनास प्रदत्त असलेल्या अधिकाराचा वापर करुन निर्गमित करण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(अजित सासुलकर)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. मा.राज्यपाल यांचे सचिव, राज्यपाल सचिवालय, राज भवन, मलबार हिल, मुंबई
२. मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे सचिव, विधान भवन, मुंबई
३. मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांचे सचिव, विधान भवन, मुंबई
४. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
५. मा.मंत्री (वैद्यकीय शिक्षण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
६. मा. विरोधी पक्ष नेता, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे सचिव, विधान भवन, मुंबई
७. मा.विरोधी पक्ष नेता, महाराष्ट्र विधानसभा यांचे सचिव, विधान भवन, मुंबई
८. मा.राज्यमंत्री (वैद्यकीय शिक्षण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
९. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई
१०. सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधीद्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई
११. महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई
१२. आयुक्त, वैद्यकीय शिक्षण, मुंबई
१३. संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय, मुंबई
१४. कुलसचिव, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक
१५. कुलसचिव, दत्ता मेघे इन्स्टिट्यूट ऑफ मेडिकल सायन्सेस (अभिमत विद्यापीठ), सावंगी (मेघे), जि.वर्धा- ४४२ १२४.
१६. प्राचार्य, श्रीमती राधिकाबाई मेघे मेमोरियल कॉलेज ऑफ नर्सिंग, सावंगी (मेघे), जि.वर्धा.
१७. निवडनस्ती (शिक्षण २)

Smt. R. M. M. College of Nursing
SAWANGI (M.), WARDHA.
Inward No. 54 A
Date 17/08/2022
CLERK